**.एस.सी.नं.५३९९/२०२३**
**नि ५ लगत**

**सरतपास फिर्यादीतर्फे ॲड. एस.बी. कराळे यांचेकडून शपथेवर सुरु.**

०२. आता मला यादी क्र.०३/1 वरील धनादेश दाखविला. त्यावर आरोपीची सही आहे. ती मी ओळखतो. त्याला **निशाणी क्र.१५** देण्यात आली. आता मला यादी क्र. ३/२ वरील रिटर्न मेमो दाखविण्यात आला. त्याला **नि.क्र.१६** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/३ वरील आरोपीला पाठविलेल्या नोटीसची स्थळ प्रत दाखविण्यात आली. त्यावर माझ्या विधिज्ञांची सही आहे. ती सही मी ओळखतो. त्याला **नि.क्र.१७** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/४ वरील आरोपीला पाठविलेल्या नोटीसची पोहोच पावती दाखविण्यात आले. त्याला **नि.क्र.१८** देण्यात आली. आता मला यादी नि.क्र.३/५ वरील जनरल मुखत्यारपत्र दाखविले. ते तेच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर मे डी.एस.ए.स्पीरीट चे प्रो.प्रा. संजय अगरवाल यांची व माझी सही आहे. मी त्यांची सही ओळखतो. त्याला **नि.क्र. १९** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/६ वरील आरोपीच्या खाताच्या खाते उतारा दाखविला. त्यावर फिर्यादी फर्मचा शिक्का आहे. तो तोच आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्याला **निशाणी क्र.२०** देण्यात आली. आता मला यादी क्र.३/७ वरील भारतीय पुरावा कायदा कलम ६५-ब चे प्रमाणपत्र दाखविले. त्यावर फिर्यादी फर्मचा शिक्का आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्याला **निशाणी क्र.२१** देण्यात आली.

सरतपास पूर्ण.

**आरोपीचे विधिज्ञाच्या तोंडी विनंतीवरुन प्रकरण उलटतपास कामी तहकुब.**

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/-

**( ई.मो. नाईकवाडी)**
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१०, अहमदनगर.

दि.१८/०१/२०२४

**आज रोजी आरोपीतर्फे उलटतपास ॲड श्री. सयद रोमण यांचे मार्फत शपथेवर सुरुः-**

३. सबंधीत पक्षकरांना माल देणे व त्या अनुषंगाने वसुली करणे हे माझ्या कामाचे स्वरुप आहे. हे म्हणणे खरे नाही की, वसुली व्यवस्थापक आहे. माझ्याकडे विक्री

वसुली हे काम आहे. या व्यतिरिक्त दुसरे काम नाही. स्टॉकीस्ट हा एक्साईज ॲक्ट प्रमाणे काम करत असतो. मी स्टॉकीस्टचा व्यवस्थापक आहे. किती स्टॉक आला व किती स्टॉक गेला या अनुषंगाने मला तंतोतंत नोंदी घ्यावे लागतात.

प्रश्न:- सदरील नोंदी तुमच्याकडे रजिस्टरमध्ये असतात.

उत्तर:- नोंदी आम्ही संगणकात घेतो.

४. सदरील नोंदी राज्य उत्पादन शुक्ल अधिकारी यांच्या निरिक्षणाकरीता उपलब्ध होतात. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीला देण्यात आलेला माल माझ्या स्टॉक मध्ये उपलब्ध होता हे दाखविण्याकरीता मी दस्तऐवज दाखल केलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला मी लिकरचा माल दिला हे मी खोटे सांगत आहे.

५. ज्या ठिकाणी माल जातो त्याठिकाणी इनव्हॉईस दिले जाते. इनव्हॉईस हा दोन प्रतित असतो. त्यातील एक प्रत ज्याला माल दिला त्यांच्याकडे असते व एक प्रत देणा-याकडे असते. माझ्याकडे असणा-या प्रतीवर माल स्वीकारणा-याची स्वाक्षरी असते. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत प्रकरणाात वरील प्रमाणे इनव्हॉईस जोडलेले नाहीत. मी अभिलेख पाहुन सांगतो की, सदरील इनव्हॉईस दाखल नाही. हे म्हणणे खरे नाही की, आपण आरोपीला माल दिला हे मी खोटे सांगत आहे.

६. माझे काम व्यवस्थापक म्हणून कार्यालयात असते. नगर जिल्हयातुन व इतर ठिकाणाहुन आमच्याकडुन भरपुर ऑर्डर येतात. दिवसातून २० ते २५ ऑडर्स येतात. प्रत्येक ऑर्डर मध्ये अनेक प्रकराच्या ब्रॅण्ड म्हणजे, वाईन, लिकर, व्होडका, बीअर असे समाविष्ठ असतात. ऑर्डर मध्ये अनेक बॉटल्स असतात व त्या अनुषंगाने त्याचे मोजमाप वेगवेगळे राहते. माझे प्रतिनिधी विविध ठिकाणी जावून ऑर्डर स्वीकारतात. सदरील प्रकरणात मी वैयक्तीकरित्या ऑर्डर स्विकारली नाही. आरोपीकडुन ऑर्डर कोणी स्वीकारली ही बाब माझ्या फिर्याद व सरतपासात नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरील प्रकरणात आरोपीने ऑर्डर दिली व मी स्वीकारली हे माझ्या वैयक्तीक ज्ञानातील नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला ऑर्डर दिली हे मी खोटे सांगत आहे.

७. हे म्हणणे खरे नाही की, स्टॉकीस्ट कडुन एकदा माल बाहेर गेल्यावर मालाची

जबाबदारी स्टॉकीस्टची नसते. हे म्हणणे खरे नाही की, स्टॉकीस्ट कडुन एकदा माल बाहेर गेल्यास त्याची जबाबदारी कॅरीअर व ट्रान्सपोर्टवर असते. आरोपीला टान्सपोर्टद्वारे माल दिला हे दाखविण्यासाठी सदरील प्रकरणात डिलीव्हरी चलन नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगत असल्याप्रमाणे आरोपीला कोणताही माल प्राप्त झालेला नाही.

८. दि.०१.०४.२०२२ ते १८.०७.२०२३ या कालावधीत आरोपीने उधारी ठेवण्याची बाब माइया समक्ष झालेली आहे. आता मला नि.क्र. २० दाखविले. त्यामध्ये थकबाकी रककम रुपये २,३१,७८१/- असा आहे. सदरील थकबाकी कोठुन व कसा आला यांची नोंद नि.क्र. २० वर नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला २,३१,७८१/- मला देणे लागत नव्हता. आरोपी सदरील रक्कम देणे लागत होता हे दाखविण्यासाठी नि.क्र. २० व्यतिरिक्त इतर कोणताही दस्तऐवज नाही. हे म्हणणे खरे नाही की, २,३१,७८१/- ही नोंद चुकीची आहे. दि.२८.०४.२०२२ रोजीची नोंद रक्क्म रुपये ५४,३०६/- हे दाखविण्यासाठी इनव्हॉईस, डेलीव्हरी चलन, स्टॉक बॅलन्स नाही. दि.२८.०४.२०२२ रोजीची नोंद रक्क्म रुपये १,०८,१५१/- हे दाखविण्यासाठी इनव्हॉईस, डेलीव्हरी चलन, स्टॉक बॅलन्स नाही. दि.०९.०५.२०२२ रोजीची नोंद रक्क्म रुपये १,८२,६८८/- हे दाखविण्यासाठी इनव्हॉईस, डेलीव्हरी चलन, स्टॉक बॅलन्स नाही. दि.२८.०५.२०२२ रोजीची नोंद रक्क्म रुपये २,२०,५६४/- हे दाखविण्यासाठी इनव्हॉईस, डेलीव्हरी चलन, स्टॉक बॅलन्स नाही. दि.२८.०५.२०२२ रोजीची नोंद रक्क्म रुपये ३,५५,८६९/- हे दाखविण्यासाठी इनव्हॉईस, डेलीव्हरी चलन, स्टॉक बॅलन्स नाही. दि.१४.०३.२०२३ रोजीची नोंद रक्क्म रुपये ४८,४९५/- हे दाखविण्यासाठी इनव्हॉईस, डेलीव्हरी चलन, स्टॉक बॅलन्स नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. २० वरील दस्तमधील नोंदी या बनावट आहेत. सदरील नोंद ही परदेशी भरतसिंग यांनी घेतलेली आहे. परदेशी भरतसिंग सांगितल्याप्रमाणे खात्यामध्ये नोंदी घेतो. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. २१ वरील प्रमाणपत्र ही तथ्थहिन आहे.

९. नि.क्र. १५ वरील हस्ताक्षर आरोपीचे आहे. हे मला आठवत नाही की, सदरील हस्ताक्षर हे माइया कार्यालयातील कर्मचा-याचे आहे. हे मी सांगु शकत नाही की, धनादेशावरील हस्ताक्षर हे माइया कार्यालयातील कर्मचारी ओळखु शकतो. सदरील

प्रकरणामध्ये माझ्या विधिज्ञाकडे मी प्रकरण दाखल करण्यासाठी गेलो होतो. त्यांची तारीख मला आठवत नाही. माझ्या सांगण्यावरुन नि.क्र. १७ ची नोटीस पारीत करण्यात आली. सदरील नोटीसेध्यम मी स्वत: माहिती दिली असे नमुद नाही. नोटीस पारीत केल्यानंतर एक महिन्यानंतर माझ्या हक्कात कुलमुखत्यारपत्र करण्यात आले आहे. हे म्हणणे खरे नाही की, नोटीस देतेवेळेस माहिती देण्याचा अधिकार मला नव्हता. नोटीस देते वेळेस माहिती देण्याचा अधिकार होता हे दाखविण्यासाठी माझ्याकडे कागदपत्रे नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, नोटीस तयार करण्याची माहिती मी विधिज्ञांना दिली नाही. नि.क्र. १७ मी माहिती दिली म्हणुन माझी सही नाही.

**<u>दोन्ही विधिंज्ञाच्या तोंडी विनंतीवरुन प्रकरण उलटतपासकामी पुढील तारखेपर्यत तहकुब.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत,

**( ई.मो. नाईकवाडी)**

दि.२९/०२/२०२४

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१०, अहमदनगर.

**<u>आरोपी व आरोपीचे विधिज्ञ पुकारले असता गैरहजर. सबब आरोपीविरुध्द उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात येतो.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/-

**( ई.मो. नाईकवाडी)**

दि.०७/०३/२०२४

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१०, अहमदनगर.

<u>एस.एस.सी.नं.५३९९/२०२३</u>
<u>नि ५ लगत</u>

**<u>नि.३३ वरिल पारित आदेशान्वये उलटतपास आरोपीचे विधीज्ञ श्री. एस.आर. सय्यद यांचेतर्फे सुरु</u>**

१०. हे म्हणणे खरे नाही की नि.१५ मधील धनदेश रकमेचा अंकी व अक्षरी मजकुर हा आरोपीने लिहीलेला नाही. आरोपीला पैसे मागितले याबद्‌दल लेखी पुरावा नाही. मी अभिलेख पाहुन सांगु शकतो की ज्या दिवशी मला धनादेश प्राप्त झाला त्याचा उल्लेख फिर्याद, नोटीस व सरतपासात नाही. साक्षीदार अभिलेख पाहुन सांगतो की सदरील बाब फिर्याद, नोटीस व सरतपासात नाही. हे म्हणणे खरे नाही की कोणत्या डिलरला व व्हेंडरला माल द्यायचा याचा निर्णय अग्रवाल साहेब घेतात. मला असे म्हणायचे आहे की माझे फर्मतर्फे मी स्वत: निर्णय घेतो. एखाद्या व्हेंडरचा माल क्रेडीटवर देण्याचा निर्णय मी घेतो. सदरील माल किती कालावधीपर्यंत क्रेडीटवर ठेवणे याचा निर्णय देखील मी घेतो. हे म्हणणे खरे नाही की आरोपीला नोटीस दिल्यानंतर मला प्रस्तुत प्रकरणाची माहिती झाली. हे म्हणणे खरे आहे की मी नोटीस दिल्यानंतर सदरचे प्रकरण मी लिड करण्यास सुरुवात केली. हे म्हणणे खरे नाही की फर्म तर्फे साक्ष देण्याचे अधिकार नाही व मला माहितीदेखील नाही. हे म्हणणे खरे नाही की आग्रवाल साहेबांच्या सांगण्यावरुन मी आज खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की आज दिलेली साक्ष मी फर्ममध्ये चर्चा झाल्याप्रमाणे दिली आहे.

११. हे म्हणणे खरे नाही की नि.१५ वरिल धनादेश मी प्रत्येक व्हेंडरकडुन सुरक्षिततेपोटी घेतो. हे म्हणणे खरे नाही की सदरचा धनादेशदेखील सुरक्षिततेपोटी घेतलेला आहे. मी अभिलेख पाहुन सांगतो की, वादातील धनादेश हा कॅश क्रेडीटचा आहे. त्यावर एक्सीड अरेंजमेंट असा शेरा मारलेला आहे. मी धनादेश दुस-यांदा वटण्यासाठी टाकला नाही. हे म्हणणे खरे नाही की मी सुरक्षिततेपोटी दिलेला धनादेश फायद्यासाठी वापरला. हे म्हणणे खरे नाही की धनादेशातील रक्कम आरोपी कायदेशीरत्यिा देणे लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/-
**( ई.मो. नाईकवाडी)**

दिनांक २३/०१/२०२५

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.०७, अहमदनगर.